॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' grade

Fax : (02462) 215572

Phone: (02462) 215246

SPECIAL CELL

website: srtmun.ac.in

E-mail: specialcell@srtmun.ac.in

जा.क्रं. : विशेष कक्ष/२०२५-२६/321

दिनांक : २८/०१/२०२६ 02/02

# परिपत्रक

विषय :— बिंदूनामावली तपासणी व आरक्षण निश्चितीबाबत.

संदर्भ :—१) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रं.संकीर्ण—२०२५/प्र.क्रं. ई—१४५०९८९/आरक्षण—३, दिनांक ४ डिसेंबर २०२५.

२) जा.क्रं.२०२५/मावक/कक्ष—३/आस्था/कावी, दिनांक ८ डिसेंबर २०२५.

या परिपत्रकाव्दारे सर्व संलग्नित अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ यांना कळविण्यात येते की, शासन निर्णय क्रं.संकीर्ण—२०२५/प्र.क्रं. ई—१४५०९८९/आरक्षण—३, दिनांक ४ डिसेंबर २०२५ अन्वये बिंदूनामावली तपासणीसाठी विलंब होऊ नये व पदभरती जलद गतीने व्हावी या दृष्टीने शासनाने सूचना दिलेल्या आहेत. तसेच मा.सहाय्यक आयुक्त (मावक), छत्रपती संभाजीनगर यांनी जा.क्रं.२०२५/मावक/कक्ष—३/आस्था/कावी, दिनांक ८ डिसेंबर २०२५ नुसार निर्देश निर्गमीत केलेले आहेत. बिदूनामावली नोंदवही तपासणीसाठी व आरक्षण निश्चितीबाबत संबंधित सूचना व निर्देशांचे काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अन्यथा यानुसार कार्यवाही न केल्यास बिंदूनामावलीतील चुकीच्या नोंदी व त्यानुषंगाने उपस्थित होणा—या बाबी/न्यायालयीन प्रकरणे याकरिता संस्था/महाविद्यालय/नियुक्ती प्राधिकारी जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी, ही विनंती.

कुलसचिव

सोबत :— संदर्भिय पत्रांच्या छायांकित प्रती.

प्रत :
अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
सर्व संलग्नित अनुदानित, विनाअनुदानित व
कायम विनाअनुदानित महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड
कुलसचिव कार्यालय
01 JAN 2026
आवक क्र. 6319

महाराष्ट्र शासन
विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग
(मागासवर्ग कक्ष)

ई-मेल bccellabad@gmail.com दुरध्वनी क्रमांक: 0240-2352350

जा.क्र.२०२५/मावक/कक्ष-०३/आस्था/कावी- दिनांक- ०८ डिसेबर२०२५

SPL. CELL 880
Inward No.
Date 07/01/2026

प्रति,

१, प्रादेशिक उप संचालक इतर बहुजन कल्याण -
छत्रपती संभाजीनगर, नादेड, लातुर
२, सहा.संचालक इतर बहुजन कल्याण -
छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव, लातुर, नांदेड, परभणी, हिगोली, जालना
३, प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी प्रकल्प -
छत्रपती संभाजीनगर, नांदेड व लातुर
४, उपसंचालक शिक्षण-
छत्रपती संभाजीनगर, लातुर
५, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि. प.
छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव, लातुर, नांदेड, परभणी, हिगोली, जालना
६, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था
छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव, लातुर, नांदेड, परभणी, हिगोली, जालना
७, शिक्षणाधिकारी, जि.प. माध्यमीक
छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव, लातुर, नांदेड, परभणी, हिगोली, जालना
८, शिक्षणाधिकारी जि.प.प्राथमीक
छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव, लातुर, नांदेड, परभणी, हिगोली, जालना
९, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी,
छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव, लातुर, नांदेड, परभणी, हिगोली, जालना
१०, कुलसचिव डॉ. बाबासाहेब आंबडेकर मराठवाडा विदयापीठ छत्रपती संभाजीनगर
११, कुलसचिव स्वामी रामानंद तीर्थ विदयापीठ नांदेड

7902







विषय:- **शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग दि. ०४ डिसेंबर, २०२५**
बिंदुनामावली तपासणी व आरक्षण निश्चितीबाबत.

संदर्भ :- शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र.ई-१४५०९८९/ आरक्षण -३
दिनांक ०४ डिसेंबर, २०२५

उपरोक्त विषयी छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व शासकीय/ निमशासकीय कार्यालयांच्या बिदुनामावलीचे प्रस्ताव तपासणी व आरक्षण निश्चीतीसाठी मागासवर्ग कक्षाकडे प्राप्त होत असतात. तथापी सदर प्रस्ताव हे नियुक्ती प्राधीकारी अथवा प्राथमीक तपासणी अधिकारी यांचे मार्फत या कक्षाकडे सादर करतांना बऱ्याच कार्यालयाचा बिदुनामावली प्रस्ताव हा नियमानुसार तपासणी न झाल्यामुळे त्रुटीसह पाठविले जातात. परिणामी बिदुनामावली तपासणी करुन अंतीम करण्यास विलंब होतो. त्यामुळे संदर्भिय शासन निर्णय दिनांक ०४ डिसेबर २०२५ व्दारे बिदुनामावली तपासणीसाठी विलंब होऊ नये व जलद गतीने कार्यवाही होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे निर्देश निर्गमीत करण्यात आलेले आहे.

१) बिदुनामावली प्रस्तावासोबत प्राप्त कर्मचारी नियुक्ती आदेश, समायोजन आदेश, जात प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र जेष्ठता यादी इत्यादी माहिती अचुक, अदयावत तपासावी.
२) ही तपासणी दोन स्तरावर केली जाणे आवश्यक आहे.
अ) MAKER (तयार करणारे अधिकारी)
ब)CHECKER (प्राथमीक तपासणी अधिकारी)
३) तपासणीचे पुर्ण दस्तऐवजीकरण सुनिश्चीत करुन त्रुटी आढळल्यास त्या त्वरीत दुरुस्त करुन घेणे आवश्यक आहे.

Special Cell

① श्री बावगे ② श्री वैजवाडे पांडुरंग
कुलिन
31 07/01/2026

Scanned with OKEN Scanner

४) तपासणी प्रक्रीयेदरम्यान आढळलेल्या कोणत्याही त्रुटी किंवा विलंबामुळे उद्भवलेल्या परिणांमाची जबाबदारी संबधित नियुक्ती प्राधिकारी तथा प्राथमीक तपासणी अधिकारी यांची राहील.

५) सदर कार्यवाहीस विलंब अथवा हलगर्जी करु नये. विलंबास गंभीर त्रुटी म्हणुन विचार केला जाईल यांची दक्षता घ्यावी.

सुलभ संदर्भासाठी शासन परिपत्रक या सोबत संलग्न करण्यात येत आहे. तरी सर्व नियुक्ती प्राधीकारी तथा प्राथमीक तपासणी अधिकारी यांना याव्दारे सुचीत करण्यात येत आहे की, आपण आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांची बिंदुनामावली अचुकपणे तपासणी करावी व सोबत जोडलेले प्रमाणपत्रासह प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा. तसेच तपासणी प्रक्रियेत कोणतीही त्रुटी अथवा विसंगती निर्माण झाल्यास शासन परिपत्रकानुसार त्याची जबाबदारी प्राथमीक तपासणी अधिकारी यांची राहील कृपया यांची नोंद घ्यावी.

सोबत :- १. संदर्भिय शासन परिपत्रकाची प्रत
२. विहित नमुण्यातील प्रमाणपत्राची प्रत.

(सरिता सुत्रावे)
सहायक आयुक्त (मावक)
विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

Scanned with OKEN Scanner

बिंदूनामावली तपासणी व आरक्षण निश्चितीबाबत.

# महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक :- संकीर्ण-२०२५/प्र.क्र.ई-१४५०९८९/आरक्षण-३

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक :- ४ डिसेंबर, २०२५.

## शासन परिपत्रक

प्रस्तावना:-

राज्यातील विविध संवर्गांच्या बिंदूनामावली तपासणी व आरक्षण निश्चितीचे प्रस्ताव मागासवर्ग कक्षास प्राप्त होत असतात. मात्र, बऱ्याच प्रस्तावांसह सादर करण्यात येत असलेल्या बिंदूनामावल्यांमध्ये नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडून अचूक नोंदी घेण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे नियुक्ती प्राधिकाऱ्याकडून प्राप्त झालेल्या बिंदूनामावल्यांच्या तपासणीमध्ये मागासवर्ग कक्षाकडून त्रुटी उपस्थित होतात. प्रस्तावातील माहिती अचूक नसल्याच्या कारणास्तव बिंदूनामावली तपासणीमध्ये आणि नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडून त्रुटीपूर्तता करण्यासाठी लागणारा कालावधी यामुळे प्रस्तावांची परिपूर्ण तपासणी करण्यास विलंब होतो. परिणामी, मागासवर्ग कक्षाकडून बिंदूनामावली तपासणीस उशीर होतो असा समज होतो. सबब बिंदूनामावली तपासण्यासाठी विलंब होऊ नये व पदभरती जलद गतीने व्हावी या दृष्टीने शासन खालीलप्रमाणे सूचना देत आहे.

१. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २९/०३/१९९७ व दि. १८/१०/१९९७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सरळसेवा व पदोन्नतीची बिंदूनामावली ठेवण्याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तद्नंतर सद्यःस्थितीत सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २७/०२/२०२४ व दि.६/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सरळसेवेसाठी बिंदूनामावली ठेवण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे.

२. त्यानुसार सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी त्यांच्या अखत्यारितील संवर्गनिहाय बिंदूनामावल्या तयार करणे व त्या बिंदूनामावल्यांची सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दि. ५/११/२००९ मधील तरतूदींनुसार मागासवर्ग कक्षाकडून तपासणी करून घेणे आवश्यक आहे.

३. सामान्य प्रशासन विभाग, शासन पत्र दि. २२/०७/२०१६ अन्वये बिंदूनामावलीचा नमुना निश्चित करून देण्यात आलेला आहे. त्यानुसार नियुक्ती प्राधिकारी यांनी विहीत नमुन्यात बिंदूनामावली तयार करून संबंधित रकान्यांमध्ये उचित नोंदी घेणे आवश्यक आहे.

४. प्रत्येक संवर्गाची बिंदूनामावली तयार करण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याची राहिल. नियुक्ती प्राधिकारी यांनी त्यांच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी (MAKER) यांचेकडून संबंधित कागदपत्रांच्या आधारे अचूक बिंदूनामावली तयार करून घ्यावी. तयार केलेल्या विविध संवर्गाच्या बिंदूनामावल्या नियुक्ती प्राधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील इतर अधिकारी (CHECKER) यांना तपासणीसाठी वाटून द्याव्यात. तपासणीअंती सदर अधिकाऱ्यांनी बिंदूनामावलीच्या शेवटी " बिंदू नामावली मधील सर्व नोंदी नियुक्ती पत्र, जातीचा दाखला , जात वैधता प्रमाणपत्र इ. कागदपत्रांवरून तपासल्या असून त्या नोंदी बरोबर आहेत." असे प्रमाणित करून

Scanned with OKEN Scanner

त्याखाली त्यांचे नाव लिहून स्वाक्षरी करावी. बिंदूनामावलीतील नोंदींमध्ये काही चुका आढळल्यास संबंधित तपासणी अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करावी.

५. अधिकाऱ्यांकडून बिंदूनामावली तपासणी केल्यानंतर प्रत्येक संवर्गातील किमान एक - दोन कर्मचाऱ्यांच्या नोंदींची तपासणी नियुक्ती प्राधिकारी यांनी करून बिंदूनामावल्यांतील नोंदी अचूक असल्याची खात्री झाल्यानंतर सदर बिंदूनामावल्या तपासणीसाठी संबंधित मागासवर्ग कक्षाकडे पाठवाव्यात..

६. उमेदवाराची ज्या प्रवर्गातून नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आली आहे त्या प्रवर्गाच्या बिंदूवर त्याचा बिंदूनामावलीमध्ये समावेश करणे आवश्यक आहे. तसेच, मागासवर्गीय उमेदवाराचे जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र याचा क्रमांक व दिनांक याची अचूक नोंद बिंदूनामावलीमध्ये घेणे आवश्यक आहे. यामध्ये काही चुका झाल्यास संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

७. बिंदूनामावलीमध्ये चूकीच्या नोंदी घेतल्या गेल्यास, आरक्षण निश्चिती अचूक होणार नाही आणि त्यामुळे आरक्षण कायद्याचा भंग होईल. तसेच, बिंदूनामावलीवर आक्षेपही उपस्थित होऊ शकतात. त्यामुळे यापुढे बिंदूनामावलीमध्ये अचूक नोंदी घेऊन व बिंदूनामावली प्रमाणित करूनच त्या तपासणीसाठी मागासवर्ग कक्षास सादर करण्यात येतील याची नियुक्ती प्राधिकारी यांनी दक्षता घ्यावी. यानुसार कार्यवाही न केल्यास बिंदूनामावलीतील चुकीच्या नोंदी व त्यानुषंगाने उपस्थित होणाऱ्या बाबी/न्यायालयीन प्रकरणे याकरिता नियुक्ती प्राधिकारी पूर्णत: जबाबदार राहतील.

८. वरील कार्यपध्दतीप्रमाणे कार्यवाही झाल्यास मागासवर्गकक्षास बिंदूनामावलीची तपासणी व आरक्षणनिश्चिती करणे सुलभ होऊन तपासणीसाठी होणारा विलंब टाळता येईल.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०२५१२०४१६२९४९६५०७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SUDAM EKNATH ANDHALE

Digitally signed by SUDAM EKNATH ANDHALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
Date: 2025.12.04 16:32:29 +05'30'

(सु. ए. आंधळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर शासन परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील सर्व आस्थापनांच्या निदर्शनास आणावे.

२. सर्व विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय यांना माहितीसाठी अग्रेषित.

३. सर्व सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), विभागीय आयुक्त कार्यालय यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

४.निवड नस्ती (आरक्षण-३)

Scanned with OKEN Scanner

वाचा :- मा.उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई-32 शासन परिपत्रक क्र संकीर्ण-2025/प्र.क्र.ई-1450989/आरक्षण-3 दिनांक :- 4 डिसेंबर 2025

जा.क्र. /--/
कार्यालयाचे नाव
दिनांक.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, ---------(सस्थेंचे नाव व पत्ता ) ------------ या सस्थेंचे --------- संवर्गाचे एकुण मंजुर पदे----- असुन कार्यरत ----- व रिक्त पदे ----- आहेत. सन- ---- संचमान्यतेनुसार सद्यस्थिती असुन प्रस्तावासोबत सादर करण्यात आलेले **नियुक्ती आदेश, मान्यता आदेश, जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र इ. कागद पत्रावरुन तपासल्या असुन सर्व कर्मचा-यांच्या नियुक्ती निवड प्रवर्गानुसार त्या-त्या प्रवर्गाच्या बिंदुवर घेतलेल्या नोंदी बरोबर असुन अचुक आहेत."** करीता प्रमाणपत्र देण्यात येते.

दिनांक -
ठिकाण

कार्यालय प्रमुखाचे नाव
कार्यालय प्रमुखाचे पदनाम
कार्यालयाचे नाव

Scanned with OKEN Scanner